अर्थसंकल्पीय अनुदान सन २०१५-२०१६

मागणी क्र. एल -५, ३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१) (०११) जकात कराऐवजी ग्रामपंचायतीना नुकसान भरपाई अनुदान (३६०४०५३२)

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अर्थसं- २०१५ /प्र.क्र.२५ /वित्त-२

बांधकाम भवन इमारत- २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
तारीख: १९ जानेवारी, २०१६

प्रस्तावना -

राज्य मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार राज्यातील ग्रामपंचायतीची त्यांच्या हद्दीतील जकात कराची वसूली दि. जुलै १९९९ पासून पूर्णपणे बंद करण्यात आलेली आहे. तसेच सदर निर्णयाप्रमाणे जकात कराची वसुली बंद झाल्यामुळे ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात संभावित तुट व त्यामुळे ग्रामपंचायती प्रशासनावर व विकास कामावर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून संबंधीत ग्रामपंचायतीना ५ वर्षापर्यंत अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे ही मुदत सन २००३-२००४ मध्ये संपुष्टात आली आहे. तथापि, याबाबत पुढील निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून हे अनुदान सन २०१५-२०१६ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात पुढे चालू ठेवण्यात येत आहे.

शासन निर्णय-

सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरीता जकात कराऐवजी ग्रामपंचायतींना नुकसान भरपाई अनुदान (३६०४ ०५३२) या लेखाशिर्षाकरीता रु.१५,८७,७३,०००/-(अक्षरी रुपये पंधरा कोटी सत्याऐंशी लक्ष त्र्याहत्तर हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

१. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि.१२/०१/२०१६ च्या परिपत्रकान्वये अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ८५ % च्या मर्यादेत वितरणास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने अर्थसंकल्पीय तरतूदीच्या मर्यादेत **रु. २,३८,१६,०५०/- (अक्षरी रुपये दोन कोटी अडतीस लक्ष सोळा हजार पन्नास फक्त)** एवढे अनुदान वितरीत करण्यास वित्त विभागांने मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर तरतूदीचे वितरण करण्यात येत असून या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे संबंधीत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सदर अनुदान सुपूर्द करण्यात येत आहे.

२. सदर निधी वितरीत करण्यासाठी संबंधीत जिल्हा परिषदाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांनी त्यांच्या जिल्हयातील संबंधीत ग्रामपंचायतींना वितरण करावयाच्या रक्कमा कोषागारातून काढून त्या धनादेशाव्दारे संबंधीत ग्रामपंचयातीना प्रदान करण्याची व्यवस्था करावयाची आहे.

३. सदर वितरीत करण्यात आलेले अनुदान जकात कराची वसूली केल्यामुळे भरपाई पोटी आलेले अनुदान असल्यामुळे या अनुदानाचे उपयोगीता प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता असणार नाही.

४. या अनुदानांचा खर्च मागणी क्र. एल ५, लेखाशिर्ष- ३६०४- स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे -२०० इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. (०१) (०११) जकात कराऐवजी ग्रामपंचायतींना नुकसान भरपाई अनुदान (३६०४०५३२)(दत्तमत)(योजनेतर)या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतूदीमधून खर्ची घालण्यात यावा. तसेच या वितरीत अनुदानाचा खर्चमेळ विषयक कार्यवाही जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पूर्ण करुन खर्चाची विवरणपत्र विभागीय आयुक्तांना पाठवावीत. विभागीय आयुक्तांनी या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापालाकडे नोंदविलेल्या खर्चाशी मेळ घालावा व अहवाल शासनाकडे पाठवावा तसेच त्यांच्या जिल्हयातील ग्रामपंचायतीनिहाय वितरीत केलेल्या आदेशाच्या प्रती शासनाकडे पाठवाव्यात.

५. जिल्हा परिषंदानी वितरीत निधीच्या खर्चाचा तपशिल शासनास पाठवावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३ दि.१२/०१/२०१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११९११३०३५६७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=241eb93ab449def8114b5fbff2ea51ab0f16e0092f0102aa9502d0457228dd65, cn=Pandurang Rawaji Khotare
Date: 2016.01.19 16:15:14 +05'30'

(पां.रा.खोटरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखापरिक्षा) (५ जादा प्रतीसह)

२) महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)(५ जादा प्रतीसह)
३) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परिक्षा) (५ जादा प्रतीसह)
४) महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता) (५ जादा प्रतीसह)
५) विभागीय आयुक्त (सर्व)
६) जिल्हाधिकारी,ठाणे, रायगड, नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, सातारा, सोलापूर, लातूर,
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, रायगड, नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, सातारा,सोलापूर, लातूर
८) मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद ठाणे, रायगड, नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, सातारा, सोलापूर, लातूर
९) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, रायगड, नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, सातारा, सोलापूर, लातूर
१०) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष ठाणे, रायगड, नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, सातारा, सोलापूर, लातूर
११) सरपंच व ग्रामसेवक (संबंधीत ग्रामपंचायती)(संबधीत जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत) त्यांना विनंती करण्यात येते की, हा शासन निर्णय तात्काळ त्यांच्या जिल्हयातील ग्रामपंचायतीना देण्याची व्यवस्था करावी.
१२) उप मुख्य लेखापरिक्षक,स्थानिक निधी लेखा,कोकण(नवी मुंबई वाशी /पुणे/ नाशिक/ अमरावती/औरंगाबाद /नागपूर)
१३) संचालक, लेखा व कोषागारे नवीन प्रशासन भवन मुंबई.
१४) निवासी लेखा अधिकारी, लेखा व अधिदान कार्यालय, मुंबई
१५) वित्त विभाग, (व्यय -१५) (अर्थसंकल्प -१६)
१६) कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग (का.क्र. वित्त-१, वित्त-७, वित्त-८)

विवरणपत्र

शासन निर्णय क्र. अर्थसं.२०१५/प्र.क्र.२५/वित्त-२, दिनांक :- १९ जानेवारी, २०१६ चे विवरणपत्र

मागणी क्र. एल -५ लेखाशिर्ष ३६०४ स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१) (०११) ग्राम पंचायतीना जकात कराऐवजी नुकसान भरपाई (३६०४०५३२) (दत्तमत) -५० इतर खर्च.

(रक्कम /रुपयात)

अ.क्र.	जिल्हा परिषद	जकात करा ऐवजी नुकसान भरपाई - ग्रामपंचायतींची संख्या	या शासन निर्णयान्वये वितरीत केलेले अनुदान	या शासन निर्णयान्वये वितरीत केलेले अनुदान
१	ठाणे	३	२०३०९९	रुपये दोन लक्ष तीन हजार नव्याण्णव फक्त
२	रायगड	३५	५८१५३२१	रुपये अठ्ठावन्न लक्ष पंधरा हजार तीनशे एकवीस फक्त
३	नाशिक	४	१९६१०९५	रुपये एकोणीस लक्ष एकसष्ठ हजार पंच्याण्णव फक्त
४	अहमदनगर	४	१४२७४२०	रुपये चौदा लक्ष सत्तावीस हजार चारशे वीस फक्त
५	धुळे	२	५१७७९७	रुपये पाच लक्ष सतरा हजार सातशे सत्त्याण्णव फक्त
६	नंदूरबार	१	४६५४५६	रुपये चार लक्ष पासष्ठ हजार चारशे छप्पन फक्त
७	जळगांव	७	१९४१३१४	रुपये एकोणीस लक्ष एकेचाळीस हजार तीनशे चौदा फक्त
८	पुणे	१	४९८०८७	रुपये चार लक्ष अठ्ठाण्णव हजार सत्त्याऐंशी फक्त
९	सातारा	३	३९५२२४३	रुपये एकोणचाळीस लक्ष बावन्न हजार दोनशे त्रेचाळीस फक्त
१०	सोलापूर	४	६३५३३९४	रुपये त्रेसष्ठ लक्ष त्रेपन्न हजार तीनशे चौ-याण्णव फक्त
११	लातूर	१	६८०८२४	रुपये सहा लक्ष ऐंशी हजार आठशे चौवीस फक्त
	एकूण	६५	२३८१६०५०	रुपये दोन कोटी अडतीस लक्ष सोळा हजार पन्नास फक्त

❖ ज्या ग्रामपंचायतींचे रुपांतर नगर पंचायतीमध्ये झाले आहे, अशा ग्रामपंचायतींचे अनुदान वगळून वरीलप्रमाणे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=241eb93ab449def8114b5fbff2ea51ab0f16e0092f0102aa9502d0457228dd65, cn=Pandurang Rawaji Khotare
Date: 2016.01.19 16:15:51 +05'30'

(पां.रा.खोटरे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन